महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर
(सामान्य प्रशासन शाखा)

दुरध्वनी क्र.- ०२४०-२३३९८११
Email- dcg.aurangabad@gmail.com

पत्ता- दिल्ली गेट जवळ,
छ.संभाजीनगर-४३१००१

**(निवडणूक प्राधान्य/तात्काळ)**

जा.क्र.२०२५/सा.प्र./प.म.नि.म.या./कावि-

दिनांक: २७.११.२०२५

प्रति,

सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी,
औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ तथा
जिल्हाधिकारी, छ.संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड

**विषय- औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ मतदार नोंदणी प्रारुप मतदार यादी (नमुना ५) प्रसिध्दी बाबत**

**संदर्भ** :- १) मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.३२२/LC/G&T/E-ROLL-BIEN, दि.१२.०९.२०२५
२) अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, म.रा. यांचे पत्र क्र.ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६, दि.१२.०९.२०२५
३) मा.भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३२२/MT-LC/G&T/E-ROLL/2026-BIEN, दि.१२.११.२०२५

भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची प्रारुप यादी दिनांक ०३.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करावयाची आहे. प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी बाबतची सूचना नमूना ५ च्या प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर नमूना ५ दिनांक ०३.१२.२०२५ रोजी प्रत्येक महसूल मंडळाच्या ठिकाणी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय इत्यादी पदनिर्देशीत ठिकाणी प्रसिध्द करण्यात यावा. तसेच पीडीएफ स्वरुपातील मतदार यादी जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीचा अहवाल दिनांक ०३.१२.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करावा.

**सोबत-** नमूना ५

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**मतदार नोंदणी अधिकारी,**
**५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ**

**प्रतिलिपी-**

1) राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना प्रत देवून कळविण्यात येते की, ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी जिल्हानिहाय व भाग निहाय पीडीएफ स्वरुपात यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर मतदार यादी जिल्हा निहाय व भाग निहाय विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर दिनांक ०३.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात यावी. त्याबाबतचा प्रसिध्दी अहवाल सदर दिवशी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावा.

*Registration of Electors Rules, 1960*
(Statutory Rules and Order)
FORM 5
(See rule 10)

## *Notice of publication of electoral roll in draft*

To

The Electors of the 05-Aurangabad Division Graduates' Constituency.

Notice is hereby given that the electoral roll has been prepared in accordance with the Registration of Electors rules 1960, and a copy thereof is available for inspection at my office (Divisional Commissioner office), and at Collector offices, office of Sub-Divisional officers, Tahsil offices in Chhatrapati Sambhajinagar Division during office hours.

The qualifying date for the preparation of the electoral roll is 1st November, 2025.

If with reference to the above said qualifying date, there be any claim for the inclusion of a name in the roll or any objection to the inclusion of name or any objection to particulars in any entry, it should be lodged on or before the 18th December, 2025 in Form 18, 7 or 8 as may be appropriate.

Every such claim or objection should either be presented in my office or to Collector offices, office of Sub-Divisional officers, Tahsil offices in Chhatrapati Sambhajinagar Division or sent by post to the address given below so as to reach me not later than the aforesaid date.

**(Jitendra Papalkar, IAS)**
**Electoral Registration Officer**
**Aurangabad Division Graduates' Constituency And**
**Divisional Commissioner Chhatrapati Sambhajinagar**

**Date :** 03rd December, 2025

---

*मतदार नोंदणी नियम, १९६०*
(संविधानिक नियम आणि आदेश)
नमुना ५
(नियम १० पहा)

## *प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीची सूचना*

प्रति,

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघातील मतदार.

सूचित करण्यात येते की, मतदार नोंदणी नियम १९६० च्या अन्वये मतदार यादी तयार करण्यात आली आहे, आणि त्याची प्रत तपासणीसाठी कार्यालयीन वेळेमध्ये माझ्या कार्यालयात (विभागीय आयुक्त कार्यालय) आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये आणि तहसिल कार्यालये येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मतदार यादी तयार करण्यासाठी अर्हता दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ आहे.

जर वर नमूद अर्हता दिनांकाच्या संदर्भाने मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी दावा असल्यास किंवा समाविष्ट नावाबाबत किंवा एखाद्या नोंदीच्या तपशीला संदर्भात कोणतीही हरकत असल्यास, नमुना १८,७ किंवा ८ मध्ये दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल करावी.

असा प्रत्येक दावा किंवा हरकत एकतर माझ्या कार्यालयात किंवा छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये, येथे प्रत्यक्ष सादर करू शकतील किंवा उपरोक्त दिनांकापूर्वी टपाला व्दारे खालील पत्त्यावर विहित मुदतीत पोहचतील या बेताने पाठवू शकतील.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**मतदार नोंदणी अधिकारी**
**औरंगाबाद विभाग शिक्षक मतदारसंघ तथा**
**विभागीय आयुक्त औरंगाबाद**

**दिनांक** : ०३ डिसेंबर, २०२५